# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.**

☎ २५६५६२३४ **Email : ropune.dte@gmail.com**

जा. क्र. : तंशिविकापु/विवि/प्रवेश /२०१६/ 4491 दिनांक: 04 NOV 2016

प्रति
प्राचार्य / संचालक
सोबत जोडलेल्या यादीमधील पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील पदवी व पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र, पदव्युत्तर पदवि एमबीए व एमसीए, पदवी वास्तुशास्त्र व पदव्युत्तर पदवी वास्तुशास्त्र, पदवी एचएमसीटी अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्तायाद्या तपासणीबाबत

संदर्भ : मा संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म रा मुंबई यांचे पत्र क्र २अ/एडीएम/२०१६/१२६७ दि२१/०९/२०१६

शासनाने महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानीत खाजगी व्यावसाईक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) कायदा २०१५, दिनांक १७/०८/२०१५ लागू केला त्यानुसार महाराष्ट्र राज्यातील विना अनुदानीत खाजगी व्यावसाईक शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबधित तदनुषंगिक बाबीसाठी, प्रवेश नियामक प्राधिकरण आणि शुल्क नियामक प्राधिकरण या दोन प्राधिकरणांची स्थापना केलेली आहे. तसेच प्रवेश नियामक प्राधिकरणांतर्गत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष निर्माण केलेला आहे. या अधिनियमानुसार तंत्रशिक्षणातील व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठीचे प्रवेश नियम व प्रवेश पात्रता शासनाने राजपत्राव्दारे दिनांक ११/०३/२०१६ रोजी प्रसिध्द केले आहेत. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेशनियम अंमलात आले व प्रवेश प्रक्रीया संपन्न झालेल्या आहेत.

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये पदवी व पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र, पदव्युत्तर पदवि एमबीए व एमसीए, पदवी वास्तुशास्त्र व पदव्युत्तर पदवी वास्तुशास्त्र, पदवी एचएमसीटी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्तायाद्या तपासणीचे काम या कार्यालयात दिनांक **०७/११/२०१६ ते दिनांक १६/११/२०१६** या कालावधीत होणार आहेत. त्या अनुषंगाने सर्व संस्थांना कळविण्यात येते की त्यांनी या सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या दिनांकास या कार्यालयास प्रवेशित विद्यार्थ्यांचे मूळ प्रमाणपत्रासह या कार्यालयास उपस्थित रहावे.

**सोबत येताना खालील बाबींची पुर्तता करण्यात यावी**

१. गुणवत्तायादी तपासणीसाठी येताना प्रवेश माहिती पुस्तीके मध्ये दिल्यानुसार आवश्यक ती सर्व मूळप्रमाणपत्रे क्रमवार लावून घेवून यावीत. ज्या संस्था मूळप्रमाणपत्रे क्रमवार लावणार नाहीत त्यांची गुणवत्तायादी तपासली जाणार नाही.

२ संस्था स्तरावर तसेच कॅप राऊड नंतर रिक्त राहीलेल्या जागांवर केलेल्या प्रवेशास अनुसरुन प्रवेश माहिती पुस्तीका २०१६-१७ मधील नियम क्र १५ नुसार केलेल्या कार्यवाहीची सर्व आवश्यक प्रमाणपत्रे

३ प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी सादर करताना प्रत्येक पानावर प्राचार्य यांची सही व शिक्का तसेच सही खाली प्राचार्याचे नाव असणे आवश्यक आहे

४ ज्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये नवीन अभ्यासक्रमास मान्यता मिळाली असेल / प्रवेश क्षमता वाढ मिळाली असेल / तसेच ज्या संस्था शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये नव्याने सुरु झाल्या असतील अशा सर्व संस्थांनी तपासणी शुल्क भरल्याबाबतची पावती ची छायाप्रत / नवीन अभ्यासक्रमास मिळालेल्या सर्व

प्राधिकारणांच्या परवानग्या (अे आय सी टी ई नवी दिल्ली / महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय / मा संचालक कार्यालयाचे मान्यता पत्र) तसेच त्या अनुषंगाने दिनांक २१/०८/२०१३ च्या शासन निर्णयात विहीत केलेल्या मुदत ठेव पावत्या यांच्या **मूळ पावत्या** पडताणीसाठी येताना सोबत आणाव्यात.

५ अल्पसंख्यांक दर्जा असलेल्या संस्थांनी अल्पसंख्याक विकास विभागाने प्रदान केलेल्या अल्पसंख्याक दर्जाच्या वैद्य असलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

६ भाषिक अल्पसंख्यांक कोटयात प्रवेश घेतलेल्या उमदेवारांच्या बाबतीत विद्यार्थ्याने सादर केलेल्या शपथपत्रानुसार त्यांची मातृभाषा आणि शाळा सोडलेल्याच्या प्रामणपत्रावर नमूद केलेली मातृभाष हि एकच असेल तरच अशा विद्यार्थ्याचे प्रवेश ग्राहय धरण्यात येणार आहेत.

७ शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच वि विद्यार्थ्याकडून सस्थेच्या बाबतीत / संस्थाव्यवस्थापनाच्या बाबतीत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाकडून अथवा तंत्रशिक्षण संचालनालयाने दिलेल्या आदेशाचे संबधित संस्थांनी पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास सदर संस्थांची गुणवत्तायादी मान्यता दिली जाणार नाही

**उपरोक्त बाबी व्यतिरिक्त खालील प्रमाणपत्रे देखील संस्थांनी गुणवत्तायादीसोबत जोडावी**

१ सर्व प्रवेश हे नियमानुसर केल्याचे प्रमाणपत्र व कट ऑफ डेट नंतर प्रवेश न दिल्याचे प्रमाणपत्र

२ शिक्षण शुल्क समितीने निर्धारीत केलेले शुल्क आकारल्याचे प्रमाणपत्र

३ फी परताव्या बाबत कोणतीही तक्रार नासल्याचे प्रमाणपत्र

४ सर्व प्रवेशित विद्यार्थ्याचे प्रवेश मा संचालक यांचे संकेतस्थळावर अद्ययावत करण्यात आले असल्याचे प्रमाणपत्र

५ प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्याची सर्व मूळ प्रमाणत्रे तपासली असून ती बरोबर व योग्य असल्याची खात्री केल्यानंतरच त्यांना प्रवेश दिला आहे या अशयाचे हमीपत्र

६ संस्थेस प्राप्त सर्व शिखर संस्थांची मान्यतापत्र

७ ई बी सी वितरण करुन उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्याचा पुरावा. ई बी सी वितरण केले नसल्यास गुणवत्तायादीस मान्यता दिली जाणार नाही

८ संस्थास्तरावर / केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेनंतर रिक्त राहीलेल्या जागांवर केलेल्या प्रवेशासाठी ०२ वर्तमान पत्रामध्ये दिलेल्या जाहिरातीची कात्रणे.

९ संस्थेमधील विद्यार्थी / कर्मचारी यांचे तक्रारीचे निराकरण झाल्याचा पुरावा.

१० या कार्यालयाने वेळोवेळी मागणी केलेल्या माहित्या.

11 १८ मुद्यांची डी व्ही डी व त्यांची हार्ड कॉपी यांची प्रत ( साक्षांकीत प्रत् )

12 ज्या अभ्यासक्रमाची शैक्षणिक अर्हता पदवी अभ्यासक्रमाचे गुणांवर आधारीत आहे अशा अभ्यासक्रमांसाठी संबंधित विद्यापीठांकडून पदवीसाठी ग्रेड ज्या गुणांवर देण्यात येते ते गुण विचारात घेऊन पात्रता निश्चित करण्यात यावी.

**सोबत - संस्थांची यादी**

प्र. सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत — प्रोग्रामर यांना कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.